# मानवाचे मूळ उद्देश

कोट्यवधी वर्षांपूर्वी पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण झाली. अगदी सुरुवातीला अतिसूक्ष्म असा एकपेशीय जीव पृथ्वीवर निर्माण झाला. पेशीच्या विभाजनातून या जीवांच्या संख्येत वाढ होत गेली. त्यानंतर सूक्ष्म जीव-जंतूपासून महाकाय डायनॉसोरपर्यंत उत्क्रांती घडत गेली. ही अगदी संथ प्रक्रिया होती. पृथ्वीवरील जैववैविध्यात वाढ होण्यास काही लाख वर्षं लागली. दरम्यानच्या काळात डायनोसॉरसारखे सरपटणारे प्राणी नष्ट झाले. त्याचप्रमाणे आकाशात संचार करणारे महाकाय पक्षीसुद्धा लोप पावले. मात्र, पृथ्वीवरील जीवसृष्टीत नवी नवी भर पडत गेली. काही लाख वर्षांपूर्वी मानवाचा पूर्वज-आदिमानव जन्माला आला. या आदिमानवाचं स्वरूप कपिवर्गीय प्राण्यांसारखं म्हणजेच गोरिला, एप, चिंपांझीसारखं होतं. त्याचं वर्तनही या प्राण्यासारखं होतं म्हणूनच माकडापासून माणूस झाला असं मानलं जातं. या आदिमानवापासून आधुनिक सुसंस्कृत माणसापर्यंत स्थित्यंतर घडण्यास काही लाख वर्षं लागली. माणूस उत्क्रांत होत असताना वातावरण व भोवतालच्या परिस्थितीचा त्याच्यावर परिणाम होत गेला. उत्क्रांतीच्या नियमानुसार स्वतःच्या अस्तित्वाचा बचाव करत ते टिकवून ठेवण्याचा प्रयत्न प्रत्येक जीव करतो. इतर प्राण्यांच्या तुलनेत मानवाची शरीररचना वेगळी होती. बचावाकरिता त्याच्याकडे नैसर्गिक शारीरिक साधनं नव्हती. बहुधा त्यामुळेच मानवामध्ये शक्तीपेक्षा युक्ती वापरण्याची प्रेरणा निर्माण झाली असावी. या प्रक्रियेत त्याच्या मेंदूचा विकास घडला. त्याची शेपटी गळून गेली. तो दोन पायांवर ताठ उभा राहू लागला. त्यामुळे मेंदूच्या बरोबरीने त्याला हात मिळाले. मेंदूच्या विकासामुळे माणसाला भोवतालच्या परिसराची

जाण, घटना लक्षात ठेवण्याची क्षमता; म्हणजेच स्मृती या गोष्टी प्राप्त झाल्या; स्मृतीतील घटना, प्रसंग आणि भोवताल यांची सांगड घालून संभाव्य धोक्याचा विचार माणूस करू लागला व त्यावर मात करण्यासाठी युक्त्या योजू लागला. उत्क्रांतीच्या वरदानातून विकसित झालेल्या मेंदूच्या बळावर माणसाने प्रचंड प्रगती केली. आज तो आकाशाला गवसणी घालत आहे. पृथ्वीवर तर त्याने नियंत्रण मिळवलं आहेच, पण आता ब्रह्मांडावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न तो करत आहे.

माणूस आज संपूर्ण जग त्याच्या मुठीत असल्याचं मानत असला तरी या सृष्टीचा तो नियंता नक्कीच नाही. या सृष्टीचा कोणी नियंता आहे किंवा नाही, दुसऱ्या शब्दांत देव आहे की नाही याबद्दल मत-मतांतरं आहेत. त्या वादात आपल्याला जायचं नाही. पण जगातील बहुसंख्य लोकांची देवावर श्रद्धा आहे. या सृष्टीचं नियंत्रण करणारी एक शक्ती आहे. तिने नियम बनवले आहेत. या शक्तीचं वरदान माणसाला मिळालं आहे, तिने माणसाला रानटीपणापासून सुसंस्कृत होण्यास मदत केली आहे. त्याला विचार करण्याची शक्ती देऊन प्रगल्भ बनवलं आहे, असं बहुसंख्य लोक मानतात. माणसाला घडवण्यामागे या नियंत्याचा काही तरी उद्देश आहे, असं ते म्हणतात. त्यांचं हे म्हणणं पटो वा न पटो, पण माणूस म्हणून माणसासाठी आणि सगळ्या जीवसृष्टीसाठी माणसाचं कर्तव्य काय आहे? त्याचं या पृथ्वीवर जन्म घेण्याचं प्रयोजन काय आहे? उद्देश काय आहे? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्याची उत्तरं माणसालाच शोधायची आहेत.

काही वर्षांपूर्वी मी एक पुस्तक वाचलं होतं, 'पृथ्वीवर माणूस उपराच!' या पृथ्वीवर अशा अनेक गोष्टी घडलेल्या आहेत. त्यात अनेक गूढ गोष्टी आहेत. भव्य दिव्य गोष्टी आहेत, ज्या घडवणं माणसाला शक्य नाही, म्हणजे त्या अन्य कोणीतरी घडवल्या आहेत असा सर्वसाधारणपणे त्याचा मथितार्थ होता. यात बहुतांशी तथ्य आहे. कारण 'देवाची करणी नारळात पाणी' अशा काही गोष्टी आपण पाहतो. भूतलावरील काही नैसर्गिक अविष्कार माणसाला अचंबित करतात. त्याला ते अद्‌भुत वाटतात. असा आविष्कार घडवणं माणसाला शक्य नाही, अशी प्रांजळ कबुली तो देतो आणि मनोमन निसर्गाचं श्रेष्ठत्व मान्य करतो.

खरंतर माणूस हा सुद्धा निसर्गाचाच एक भाग आहे. इतर अनेक नैसर्गिक आविष्कारांप्रमाणे माणूस हा देखील एक आगळावेगळा नैसर्गिक आविष्कार आहे. मध्यंतरी एका मित्राशी चर्चा करत असताना तो म्हणाला होता की माणसाला स्वतःचा

गर्व वाटला पाहिजे की, तो माणूस आहे. माणूस हा अद्वितीय आहे, अतुलनीय आहे. कोणत्याही दोन माणसांचे बोटांचे ठसे सारखे नसतात. डोळ्यांतील कॉर्नियातील काही गोष्टीही सारख्या नसतात. याचा अर्थ माणूस जन्माला येतो ती एक विशिष्ट ओळख घेऊन. जगातल्या प्रत्येक माणसाच्या बोटांचे ठसे भिन्न असतात, म्हणजेच प्रत्येक माणूस 'युनिक' असतो, वेगळा असतो.

उत्क्रांतीच्या विविध टप्प्यांवर माणसाचा मेंदू सर्वाधिक प्रगल्भ होत गेला आहे. सर्व प्राणीमात्रांमध्ये मानवी मेंदू सर्वाधिक प्रगल्भ आहे. ज्यायोगे तो घटना-प्रसंग स्मृतीत ठेवू शकतो. मेंदूमुळे त्याला कालभान प्राप्त झालं आहे. त्यामुळे कालक्रमानुसार तो आठवणी साठवू शकतो. हा त्याला आलेल्या अनुभवांचा संग्रह असतो. त्याच्या मेंदूमध्ये विचार करण्याची शक्ती विकसित झाली. भोवतालाचं भान आणि अनुभव या आधारांवर तो विचार करू शकतो, तर्क करू शकतो. का व कसं? हे प्रश्न त्याला पडू शकतात व या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी तो संशोधन करू शकतो. आपले विचार व्यक्त करण्यासाठी त्याने भाषा निर्माण केली आहे, तो इतर मानवांशी संवाद साधू शकतो. या साऱ्यांमधून जे ज्ञान त्याला प्राप्त होतं त्याचा लाभ त्याला व त्याच्या पुढच्या पिढ्यांना होतो. माणसाची ही वैशिष्ट्य इतर कोणत्याही प्राण्यांमध्ये आढळत नाहीत. त्यांची स्मृती मर्यादित व विशिष्ट्य काळापुरती असते. ते विचार करू शकत नाहीत. त्यांचा सारा जीवनक्रम मूलभूत प्रेरणांवर-बेसिक इन्स्टिंक्ट्सवर आधारित असतो. आहार, विहार आणि मैथून या त्या मूलभूत प्रेरणा, याशिवाय स्वतःच्या बचावाची जाणीव ही आणखी एक प्रेरणा. या प्रेरणा मानवाजवळही आहेतच. त्यांचा वापर तो करतोच पण आपल्या जीवनाची गुणवत्ता वाढवण्यासाठी तो बुद्धीचा वापर करतो.

आधी म्हटल्याप्रमाणे उत्क्रांतीच्या वरदानामुळे माणसाचा मेंदू विकसित झाला, तो दोन पायांवर चालू लागला त्यामुळे त्याला हातांचा लाभ झाला याशिवाय त्याची ज्ञानेंद्रियं विकसित झाली. डोळे, नाक, कान, जीभ आणि त्वचा या इंद्रियांच्या साहाय्याने तो भोवतालातल्या गोष्टींचं आकलन करू शकतो, नवं नवं ज्ञान जमा करू शकतो. माणसाची प्रत्येक पिढी आपली ज्ञानग्रहण क्षमता वाढवत असल्याचं दिसून येते. माणसाला मिळालेली ही ताकद आहे. याशिवाय माणसाचं एक वैशिष्ट्य म्हणजे, तो सामाजिक प्राणी आहे. तो एकटा राहू शकत नाही, त्याला माणसं हवी असतात, नातेसंबंध हवे असतात, त्याचं कोणीतरी ऐकायला हवं असतं, बोलायला

हवं असतं, आपल्या विचारांची देवाण-घेवाण करायला कोणीतरी हवं असतं. त्याच्या या गरजांपोटी त्याने अनेक शोध लावले व स्वतःचं एक विश्व तयार केलं आहे. आजच्या काळात इंटरनेटद्वारे साऱ्या जगाची माहिती केवळ एका क्लिकवर आली आहे. संगणकावर क्लिक केलं की हवी ती माहिती समोर येते. ही मानवी तंत्रज्ञानाची परिसीमा आहे. इतकी प्रगती साधून माणूस आज एका विलक्षण उंचीवर पोहचला आहे; पण त्याचबरोबर या भूतलावर माणसाच्या अस्तित्वाचे उद्देश काय आहेत, याचा विचार करण्याचीही गरज निर्माण झाली आहे.

मी सकाळी उठतो, प्रातर्विधी आटपतो, स्नान करतो आणि रात्रीच्या उरलेल्या अन्नाचे चार-पाच घास कावळ्यांना देतो. रस्त्यावरील कुत्र्यांना देतो. आम्ही गप्पी मासे पाळले आहेत, त्यांना एखादा घास टाकतो. मला असं वाटतं, की माणूस म्हणून ही माझी जबाबदारी आहे. माझ्या मते या सृष्टीची काळजी घेण्याची जबाबदारी मानवावर आहे. माणसाने आपलं विश्व निर्माण करताना सृष्टीवर वर्चस्व निर्माण केलं आहे. सृष्टीवर तो हक्क गाजवत आहे. हे माझं आहे, असं तो म्हणतो. मी जेव्हा एखाद्या गोष्टीचं स्वामित्व घेतो त्यावेळी त्या गोष्टीचं रक्षण करण्याची, जतन करण्याची, संवर्धन करण्याची जबाबदारी माझी असते. सृष्टीतील सूक्ष्म जीव-जंतूंपासून मोठया वन्यप्राण्यांपर्यंत, गवताच्या पात्यापासून मोठ्या वृक्षांपर्यंत साऱ्यांची काळजी माणसाने घेतली पाहिजे. एका मोठ्या वडाच्या झाडावर हजारो पक्षी रहात असतात, हजारो किड्या-मुंग्या त्यावर जगतात, अनेक प्राणी त्याच्या ढोलीत आश्रय घेतात, त्या झाडाखालून जाणारे हजारोजण तिथे दोन घटका विसावा घेतात, शुद्ध ऑक्सिजनचा त्यांना लाभ मिळतो. असा अनेक जीवांचा हा आधारवड एखादा माणूस यांत्रिक करवत चालवून काही थोड्या मिनिटांत भुईसपाट करू शकतो. त्याला तोडू शकतो, मोडू शकतो, नष्ट करू शकतो. माणूस या सृष्टीचं रक्षण करण्याऐवजी तिचं ज्ञान-संवर्धन करण्याऐवजी तिचा नाश का करत आहे? त्याचं असं कृतघ्न वागणं योग्य आहे काय? या गुन्ह्याबद्दल त्याला शिक्षा कोण देणार? आणि काय देणार? माणसानं माणसाची हत्या केली तर त्याला जन्मठेप होते, क्वचित मृत्युदंडाची शिक्षा होते पण एखाद्या माणसाने नाहक एखाद्या प्राण्याचा, पक्ष्याचा छळ केला, त्याचा बळी घेतला, एखादं झाड तोडलं, वनराई नष्ट केली, हवा, पाणी, अन्न अशा जीवनावश्यक गोष्टी प्रदूषित केल्या, तर त्या माणसाला काय शिक्षा द्यायची? माणूस जर स्वतःला खूप बुद्धिमान समजत असेल, स्वतःला या जगाचा राजा समजत असेल, तर सृष्टीचा समतोलाचं महत्त्व त्याला समजून घेता आलं पाहिजे. सृष्टीचा समतोल

ढळणार नाही याची काळजी त्याने घेतली पाहिजे. एखादं उपद्रवी गवत माजलं असेल, तर त्याच्या बंदोबस्तासाठी ते जाळून टाकणं वेगळं आणि एखादं रान पेटवून देणं वेगळं. कधी-कधी जंगलात नैसर्गिकरीत्या वणवा पेटतो. या जंगलात कीडा-मुंगी, पशु-पक्षी, झाडं-वनस्पती असतात. त्यांना वाचवण्यासाठी माणसाने रानाला लागलेली आग विझवली पाहिजे. सृष्टीचं सातत्य टिकवण्याचा प्रयत्न माणसालाच करावा लागेल, कारण त्याच्या अस्तित्वाचं सातत्य त्यावर अवलंबून आहे. या जगाचं नियंत्रण सृष्टीच्या बहुवैविध्याला अनुसरून झालं पाहिजे, केलं गेलं पाहिजे. हे जेव्हा मानव-जातीला समजेल त्यावेळी त्याचा या पृथ्वीवर येण्याचा खरा उद्देश सफल होईल.

आज माणूस अनेक प्रकारे विभागला गेला आहे. तो रंगभेद मानतो, तो वर्णभेद मानतो, धर्मभेद मानतो, जातीभेद मानतो, लिंगभेद मानतो, प्रांतभेद मानतो, भाषाभेद मानतो. या गोष्टींनुसार माणूस वेगवेगळ्या गटात वाटला गेला आहे. यात स्वतःला श्रेष्ठ समजणारे काही गट आहेत. ते दुसऱ्या गटाला कनिष्ठ समजतात व दुसऱ्यांना गुलामासारखं वागवतात. या भेदा-भेदांतून विषमता निर्माण झाली आहे. अशाप्रकारे आपण आपल्याला वेगवेगळ्या प्रकारे विभागून घेतल्यामुळे आणि विषमता निर्माण केल्यामुळे आपण आपल्या मूळ उद्देशापासून-सृष्टीचं जतन- संवर्धन करण्याच्या कर्तव्यापासून भरकटलो आहोत. नदी आपलं काय वाईट करते? समजा नदीला येणाऱ्या पुरांपासून आपलं नुकसान होत असेल, तर नदीला बांध घालता येईल, तट बांधता येतील, घाट बांधता येतील. पण त्याच नदीत सांडपाणी सोडलं जात असेल, कचरा टाकला जात असेल, मृत जनावरंच नव्हे, तर मानवी प्रेतंसुद्धा सोडली जात असतील, तर त्या नदीच्या पाण्याचा कोणाला उपयोग होणार आहे? हे माहित असूनही आपण नदीचं पाणी प्रदूषित करत असतो. हे आपल्या मूळ उद्देशाच्या अगदी विपरीत आहे.

जो जन्माला आला, त्यांचं आयुष्य एक ना एक दिवस संपणार, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. माणसाला ईश्वराने विचार करण्याची शक्ती दिलेली असल्यामुळे माणूस आपल्या आयुष्याचं कालमापन करू शकतो. आपले किती दिवस राहिले आहेत, आणि आपल्याला काय करायचं आहे, याचा विचार माणूस करू शकतो. मला एक ना एक दिवस जायचं आहे, पण त्या अगोदर मला सृष्टीचा नाश करायचा आहे की, तिला टिकवून ठेवायचं आहे, हा विचार ज्याला-त्याला करायचा आहे. माझ्या नंतर माझ्या साम्राज्याचा नाश झाला पाहिजे की आपल्या पुढच्या पिढीसाठी काही शिल्लक ठेवायचंय? आपण जे राखून ठेवू-मग ते ज्ञान

असेल, संस्कार असतील, धन असेल, संपत्ती असेल, त्याच्या आधारावर आपली पुढची पिढी अधिक प्रगती करू शकते. आपले चांगले-वाईट अनुभव आपल्या पुढच्या पिढीला मार्गदर्शन करू शकतात. आपल्या अनुभवाचं ज्ञान पुढच्या पिढीसाठी एखाद्या औषधाच्या गोळीसारखं काम करतं. जशी औषधाची गोळी पोटात गेल्यानंतर आपल्या प्रकृतीचा बिघाड दूर होतो. तसेच आपले अनुभव पुढच्या पिढीला एखादा निर्णय घेताना दहा वेळा विचार करण्यास भाग पाडतील. आपण केलेल्या चुका पुढच्या पिढीला टाळता येतील. आपल्या पुढच्या पिढीसाठी आपलं ज्ञान, आपले संस्कार, आपले अनुभव राखून ठेवणं, ते त्यांच्या हाती सोपवणं हा देखील आपल्या जीवनाचा एक मुख्य उद्देश आहे.

आपण आपल्या आयुष्यात ज्या चांगल्या गोष्टी केल्या, ज्या योग्य गोष्टी केल्या त्याचबरोबर आपल्या हातून ज्या चुका घडल्या त्यासुद्धा आपण प्रांजळपणे सांगितल्या पाहिजेत. या चुका कशा टाळता येतील यासाठी काही नियम केले पाहिजेत व त्यांचे पालन करण्यास सांगितलं पाहिजे. माणसाच्या आयुष्याचे हे जे उद्देश आहेत त्याकरिता जागतिक स्वरूपातल्या संहितेची रूपरेषा ठरवावी लागेल. या जगातील प्रत्येक व्यक्ती अतुलनीय आहे आणि श्रेष्ठ आहे. जगात प्रत्येक व्यक्तीचं काही ना काही काम आहे. त्याचं व्यक्तिगणिक नियोजन केलं पाहिजे. सर्वसाधारण स्तरावर या गोष्टी सांगता येतात, म्हणजे माणसांनी अमुक करावं, तमुक करू नये वगैरे, पण या गोष्टींचं शेवटच्या माणसांपर्यंत नियोजन म्हणजे मायक्रो प्लॅनिंग (सूक्ष्म स्तरावर) झालं पाहिजे. उदाहरणार्थ, एक डॉक्टर विवेक क्षीरसागर जन्माला आला, त्यानं काय केलं, त्याने काय करायला पाहिजे. तो निवृत्त झाला, त्यानंतर त्याने काय केलं पाहिजे, त्याला कोणत्या संधी असतील, त्या त्याने कशा मिळवल्या पाहिजेत, त्याच्या ज्ञानाचा फायदा समाजाला कसा मिळू शकेल. अशाप्रकारे प्रत्येक माणसाचं त्याच्या पातळीवर आपण नियोजन करू शकलो, तर सूर्यप्रकाशात जसा ताजमहालाचा कोपरा उजळून निघतो तसा हा मानव समाज उजळून निघेल आणि या जगावर त्याचं नियंत्रण असल्यामुळे जगातील प्रत्येक गोष्ट उजळून निघेल.

अनेक साम्राज्य उदयाला आली आणि लयाला गेली, हे आपण इतिहासात शिकलो आहोत. ब्रिटिशांच्या साम्राज्यावरून सूर्य मावळत नव्हता, अशी विधानं आपण वाचली आहेत. आज हे साम्राज्य कोठे आहे. हडप्पा-मोहेंजोदडो या खूप प्रगल्भ संस्कृती होत्या, इजिप्तची संस्कृती महान होती; पण या संस्कृतींचे आता फक्त अवशेष सापडतात. महाभारत काळातील हस्तिनापूर आज कोठे आहे? चंद्रगुप्त मौर्याचं

मगध साम्राज्य म्हणजे आजचा बिहार. मगध साम्राज्य खूप समृद्ध होतं. आजच्या बिहारमध्ये ती समृद्धी का दिसत नाही? म्हणजे या गोष्टी कायमस्वरूपी टिकत नसतात. एखाद्या पिढीला त्याचा फायदा होतो, पण तो पुढे लुप्त होतो. या साऱ्या गोष्टींचा विचार केला, तर तुम्ही आम्ही ठरवलं पाहिजे. आपल्या जीवनाचा उद्देश काय असला पाहिजे, आणि हे उद्देश रावापासून रंकापर्यंत समान असले पाहिजेत.

पौरस राजाला सिंकदराने युद्धात हरवून बंदी बनवलं होतं. सिंकदराने पौरसाला विचारलं, 'तुला मी कसं वागवावं?' पौरस म्हणाला, ' मी राजा आहे, एका राजाने दुसऱ्या राजाला राजासारखं वागवावं.' हे उत्तर फार महत्त्वाचं आहे. आज आपण माणूस म्हणून जगतो आणि दुसऱ्या माणसाला गुलाम बनवतो, त्याला हीन मानतो. एक माणूस दुसऱ्या माणसाला कमी प्रतीचा, वेगळ्या जातीचा, वेगळ्या रंगाचा, अशिक्षित, गरीब अशा वेगवेगळ्या परिस्थितीवरून त्याला डावलतो. हा देखील माणूस आहे, हा विचार माणूस करत नाही. माणसाने माणसाला माणसासारखं वागवावं. एखाद्याचं शोषण करण्याचा, एखाद्याला हीन-दीन लेखण्याचा अधिकार माणसाला कोणी दिला? माणूस म्हणून माझ्या जगण्याच्या उद्देशाशी हे किती सुसंगत आहे? लोकशाहीची व्याख्या लोकांनी, लोकांसाठी लोकांद्वारे चालवलेलं राज्य अशी केली जाते. माणसांनी माणसांच्या उत्कर्षासाठी चालवलेली ही व्यवस्था आहे; पण बहुसंख्य माणसं स्वतःचाच विचार करतात. समाजाचा करत नाहीत.

वेदांत ॲकॅडमीचे पार्थसारथी याचं एक व्याख्यान मी ऐकलं होतं. त्यात ते म्हणाले होते, तुमचं कुटुंब हे तुमच्या विचारांचं केंद्र असायला हरकत नाही, ती मूलभूत प्रेरणा आहे. प्रत्येक प्राण्यामध्ये ती असते. माझ्यानंतर माझा वंश पुढे गेला पाहिजे. ही ती प्रेरणा. वडाचं झाड एवढ्या बिया का तयार करतं? त्याच्यासारखे वटवृक्ष जगभरात पसरावेत ही त्याची प्रेरणा असते. एका स्खलनात कोट्यवधी शुक्रजंतू असतात, ते का असतात? तर माझी पिढी माझा वंश वाढावा, ही मूलतः प्रत्येक जीवाची प्रेरणा आहे; पण पार्थसारथी म्हणतात, या प्रेरणेला तुमच्या कार्यक्षेत्राचा परीघ बनवू नका. म्हणजे मी आणि माझ्या कुटुंबाशिवाय दुसरं काहीच नाही, माझ्या शेजारी कोणी जगतंय की मरतंय मी बघणार नाही. मी फक्त माझ्या घरात स्वच्छता ठेवणार, माझ्या घरातला कचरा बाहेर टाकणार, हे योग्य आहे का? तुमचा जन्म समस्त सृष्टीच्या रक्षणासाठी झाला आहे, हे तुम्ही विसरता कामा नये. या पृथ्वीतलावर जे जे सजीव आहे, जे जे निर्जीव आहे या साऱ्याची माणसाने काळजी घेतली पाहिजे. हवा असेल, पाणी असेल, बर्फ असेल, दगड असेल, माती असेल. या साऱ्यांचा

आपल्या जीवनात उपयोग आहे. त्यांची काळजी घेणं म्हणजे आपल्या साधनांचं व्यवस्थापन करणं आहे. हे एक प्रकारचं रिसोर्स मॅनेजमेंट आहे. साऱ्या जगाची ऊर्जा एक आहे, साऱ्या जगाचा प्रकाश एक आहे, तसेच जगातील जे सर्व सजीव-निर्जीव आहेत, ते समान आहेत. माणसाने आपल्या जगण्यासाठी इतर सजीव-निर्जीवांची हानी करायची, हे योग्य नाही या ब्रह्मांडात, या सृष्टीत, या पृथ्वीतलावर ज्या ज्या सजीव- निर्जीव गोष्टी आहेत त्यांच्या जतन- संवर्धनाची जबाबदारी माणसाची आहे. त्याचं नियोजन करणं ही माणसाची जबाबदारी आहे. ते माणसाच्या हिताचं सुद्धा आहे. एखादा पदार्थ अमेरिकेत तयार होत असेल, तर तो भारतातही व्हायलाच पाहिजे, हे आवश्यक नाही. एकमेकांमध्ये देवाण-घेवाण झाली पाहिजे. एकमेकांनी एकमेकांना आधार दिला पाहिजे. एकमेकांनी एकमेकांची पिळवणूक करता कामा नये. तुम्ही इतरांची पिळवणूक करत असाल, तर तुमच्यात आणि जनावरांत काय फरक राहतो? प्रत्येक लहान व्यक्तीचा आत्मसन्मान जपला गेला पाहिजे, त्याला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. कळसावरच्या दगडाला जी किंमत आहे, ती पायाखालच्या दगडालाही मिळाली पाहिजे.

इतिहासात आपण वाचतो की, एखाद्या राजाने रस्ते बांधले, तलाव बांधले, विहिरी खोदल्या, झाडं लावली, उद्यानं तयार केली वगैरे; पण या साऱ्या गोष्टी तुम्ही-आम्ही करायला पाहिजेत. 'अतिथी देवो भव' ही वृत्ती आपण जपली पाहिजे. प्रेम, सद्भावना प्रत्येकाच्या ठायी असली पाहिजे. कटुतेची भावना मनातून दूर केली पाहिजे. तुम्ही तुमच्या स्वार्थासाठी काही कठोर निर्णय घेत असाल, तर तो निर्णय तुमच्या मुळाशी येऊ शकतो, पण तुम्ही सार्वजनिक हितासाठी घेतलेला एखादा कठोर निर्णय कदाचित त्यावेळेस लोकप्रिय होणार नाही, पण त्या निर्णयाची चांगली फळं मिळू लागल्यानंतर सारेजण त्या निर्णयाची प्रशंसा करतील.

प्रत्येक माणसाच्या मनात जसा राम आहे. तसाच रावणही आहे. आपल्याला चांगल्या गोष्टी कराव्याशा वाटतात. चित्रपटातील एखादा करुण प्रसंग पाहताना आपल्या डोळ्यांत पाणी येतं, एखाद्यावर वाईट प्रसंग ओढवला, तर त्याचं वाईट वाटतं. हे आपल्या मनात राम असण्याचं लक्षण आहे, तर एखाद्याचं वाईट व्हावं असा विचार करणं, वाईट झालं तर आनंद वाटणं ही झाली रावण प्रवृत्ती. सिंकदराने जग जिंकलं पण तो हात हलवत वर गेला, त्याने काय मिळवलं? आयुष्याच्या अखेरच्या क्षणी वेळ थोडा राहिलेला असतो. तेव्हा माणूस आपण राम प्रवृत्तीने जगलो की रावणप्रवृत्तीने याचा विचार करू लागतो, पण तेव्हा वेळ निघून गेलेली




असते. माणूस आयुष्यात प्रथम धावतो ते मूलभूत गरजा भागवण्यासाठी, एकदा या मूलभूत गरजा पूर्ण झाल्या की, आणखी सुखकारक, आरामदायी सुख देणाऱ्या गोष्टींमागे धावतो त्या प्राप्त झाल्यावर स्वतःच्या नावासाठी, प्रतिष्ठेसाठी त्याचा झगडा सुरू होतो. या सगळ्या धावपळीत मी कोण आहे, माझ्या जगण्याचा उद्देश काय याचा विचार करायला फुरसत मिळत नाही, मग माणूस मृत्यूशय्येवर याचा विचार करायला लागतो. आयुष्याचे दिवस संपत आले की माणूस 'देव देव' करू लागतो; पण यावेळी विचार करून काय उपयोग? तुमच्या जीवनात तुम्ही खोट्या प्रतिष्ठेसाठी धावाधाव न करता, खरं प्रेम, खरा आनंद, खरं समाधान मिळवण्यासाठी प्रयत्न कराल, तर तुमचं जीवन अधिक सफल बनवू शकाल. आयुष्याच्या खऱ्या उद्देशपूर्तीचा आनंद तुम्हाला मिळेल. माणूस कशासाठी जन्माला आला, याचं रहस्य जर माणसाला कळलं आणि आपण कळसाचे दगड आहोत की पायाचे दगड आहोत याची समज आली तर पायाचे दगड झालो म्हणून खंत वाटणार नाही; कारण आपण आयुष्यात जे काही असतो, ती आपली उपलब्धी असते. आपण लहान आहोत की मोठे, यापेक्षा आपण जसे आहोत तसे समाजाकरता उपयुक्त आहोत ही जाणीव खूप महत्त्वाची असते. हे माणसाला जेव्हा कळेल, तेव्हा होणारा आनंद हा आत्मिक आनंद असेल; आणि तो कोणी हिरावून घेऊ शकणार नाही. प्रत्येकालाच 'हिरो' होता येत नाही. अनेकजण पडद्यामागे महत्त्वाची भूमिका बजावत असतात म्हणून पडद्यावरचा 'हिरो' साकार होत असतो. त्याने हे लोकांना सांगितलं पाहिजे, की मी जरी 'हिरो' असलो तरी पडद्यामागे अनेक हिरो आहेत, त्यांच्या प्रेम व आशिर्वादामुळे मी इथे आहे. पडद्यामागच्या हिरोंनाही याचं समाधान वाटेल. पडद्यावरच्या हिरोंचा अहंगंड आणि पडद्यामागच्या हिरोंचा न्यूनगंड दूर होईल.